




# पारनेर दर्शन

वर्ष ३ अंक ३९, शनिवार २८ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये







# नगरसेवक युवराज पठारेसह पाच जणांविरोधात गुन्हा

## अपहरण करून बेदम मारहाण




**पारनेर : प्रतिनिधी**

**गणपती देवस्थानच्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी केल्याच्या रागातून पारनेर नगरपंचायतीचे नगरसेवक युवराज पठारे व इतरांनी देवस्थान समितीच्या सदस्याचे अपहरण करून त्यास बेदम मारहाण केल्याची घटना गुरूवारी घडली.**

**यासंदर्भात सुनिल भाऊसाहेब चौधरी रा. डिकसळ, हल्ली राहणार गणपती फाटा, गौरीनंदन मंगल कार्यालय, पारनेर यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे की, चौधरी हे लोकजागृती सामाजिक संस्थेमध्ये सामाजिक काम करतात. पारनेर शहरातील गणपती देव देवस्थानचे ते सदस्य आहेत. पारनेर शहरात पारनेर-सुपा रस्त्यालगत या देवस्थानची तब्बल ३६ एकर जमीन आहे.**

फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे की, देवस्थानच्या जागेवर युवराज कुंडलीक पठारे, नामदेव पठारे व बाळासाहेब पठारे व इतरांनी अतिक्रमण केलेले आहे. अतिक्रमण काढावे म्हणून सन २०१८ मध्ये देवस्थानच्या ट्रस्टींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी होउन न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पारनेर नगरपंचायतकडे हे अतिक्रमण काढण्यासंदर्भात नोटीस पाठविण्यात आल्या होत्या. सात दिवसांपूर्वी नगरपंचायतीच्या वतीने अतिक्रमणधारकांना या नोटीस बजाण्यात आल्या होत्या. नोटीस बजावल्यानंतर पारनेरच्या न्यायालयात युवराज पठारे यांची भेट झाली त्यावेळी त्याने आपणास भेटून यात पडू नकोस नाहीतर तुला जीवे मारून अशी धमकी दिली होती. असे सुनिल चौधरी यांनी फिर्यादीमध्ये नमुद केले आहे.

सात दिवसांची नोटीस देण्यात येऊनही अतिक्रमण न काढल्याने गुरूवार दि.२६ डिसेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सचिव सुधीर देवीदास पाठक यांच्या सांगण्यावरून सुनील चौधरी हे नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे गेले होते. शिपाई यांच्या दालनामध्ये अतिक्रमणासंदर्भात चर्चा सुरू असताना युवराज पठारे व इतर दोन इसम तिथे आले व तुझा इथे येण्याचा काय संबंध ? तु यामध्ये पडू नको नाहीतर मी तुला जीवे मारील अशी धमकी मुख्याधिकारी शिपाई यांच्यासमोर युवराज पठारे यांनी दिल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.
युवराज पठारे यांच्याधमकीनंतर सुनिल चौधरी याने मी देवस्थानचा ट्रस्टी आहे असे सांगताच मुख्याधिकारी शिपाई यांच्यासमक्ष मी याला आता उचलून घेऊन जाणार आहे, त्याला तिकडेच मारून टाकतो, आज याचा विषय संपवितो अशी धमकी देत युवराज याने सुनिल याची गचांडी धरली तर इतर दोघांनी नगरपंचायतच्या कर्मचाऱ्यांसमक्ष उचलून कार्यालयाबाहेर आणले.

सुनिल चौधरी यास कार्यालयाबाहेर आणल्यानंतर तिथे उभ्या असलेल्या काळया रंगाच्या थार जीपमध्ये बसविण्यात आले. त्याला युवराज पठारेसह इतरांनी जीपमध्येच मारहाण करण्यास सुरूवात करण्यात आली. त्यानंतर जीप युवराज पठारे यांच्या घराकडे नेण्यास चालकाला सांगण्यात आले. पठारे यांच्या घरी गेल्यानंतर एका खोलीत कोंडून मारहाण करण्यास सुरूवात करण्यात आली. जवळचा मोबाईल काढून पोलीसांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता युवराज याने मोबाईल हिसकावून घेतला. मोटारसायकलची चावी, पैशांचे पाकिटही काढून घेण्यात येऊन युवराज कुंडलिक पठारे, त्याचा भाऊ यशवंत उर्फ आबा कुंडलिक पठारे, चुलते बाळासाहेब पठारे, युवराजचे वडील कुंडलिक पठारे व युवराजची पत्नी व इतर सात ते आठ जणांनी बेदम मारहाण केली.

मारहाण सुरू असताना युवराज पठारे हा याला जिवंत सोडू नका असे म्हणत होता. मारहाणीत सुनिल चौधरी याच्या तोंडास, डोक्यास, उजवा हात, उजव्या पायाचा गुढगा, पोटरी, छाती व पाठीस मार लागलेला आहे. मारहाणीनंतर युवराज पठारे याने तुझा वकील भाऊ उन्मेश हा आमच्या विरोधात कोर्टात केसेस लढतो आता तुला व तुझ्या भावालाही संपवतो असा दम दिल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे. सुनिल चौधरी याचे अपहरण करून त्यास मारहाण सुरू असल्याची माहीती पोलीसांना समजल्यानंतर पोलीसांनी युवराज पठारे याच्या घरी येत सुनिल चौधरी यास ताब्यात घेण्यात आले. पोलीस आल्यानंतर याने घरात चोरी केली आहे त्याला घेऊन जा असे पठारे परिवारातील सदस्य सांगत होते असेही या फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

# सुप्यात गुटख्यावर कारवाई, ७ लाखांचा मुद्देमाल जप्त!

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई | ८आरोपींविरोधात ३ गुन्हे




■ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करीत सुपे परीसरात गुटखा, सुगंधीत तंबाखू तसेच वाहने असा सात लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.होण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर शिवसैनिकांनी मोठे मताधिक्क्य देण्याचा निर्धार केला.यांच्या उपस्थितीत कार्यान्वीत करण्यात आला.

**सुपा : प्रतिनिधी**

**गुटखा, सुगंधीत तंबाखूची वाहतूक तसेच विक्री करणा-या तिन ठिकाणी छापे टाकून नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपींकरून ६ लाख ९४ हजार ३९८ रूपयांचा मुददेमाल जप्त केला. याप्रकरणी आठ आरोपींविरोधात सुपा पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

वाढत्या अवैध व्यवसायांविषयी नापसंती व्यक्त करत पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचारी पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश लोंढे, बाळासाहेब गुंजाळ, रोहित येमुल, रणजित जाधव, रोहित मिसाळ यांचे पथक तयार करून सुपा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायीकांची माहीती काढून कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

गुरूवार दि.२६ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी प्रतिबंध असलेली व शरीरास आपायकारक होईल अशी खाद्यपदार्थ सुगंधीत तंबाखू, पान मसाला, गुटखा विक्री व वाहतूक करणा-या व्यक्तिंची माहीती संकलीत करून पंचांसमक्ष विविध तीन ठिकाणी छापे टाकून कारवाई करण्यात आली. कारवाईनंतर सुपा पोलीस ठाण्यात आठ आरोपींविरोधात ३ गुन्हे दाखल करण्यात आले. आरोपींच्या ताब्यातून विविध कंपन्यांचा पान मसाला, गुटखा, तंबाखू व वाहने असा ६ लाख ९४ हजार ३९८ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संपत भोसले यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

### मुद्देमाल व आरोपी

(८ हजार ६०२ रूपये)

**दत्तात्रय शिवाजी नांगरे वय ४५ रा. सुपा, अस्लम शेख रा. सुपा फरार (६ लाख ७७ हजार ६६९ रूपये) अनिकेत रामदास सोनवणे रा. ढवळगांव ता. श्रीगोंदे, स्वप्निल सोन्याबापू साबळे रा. रूईछत्रपती, ता. पारनेर, प्रसाद दिलीप तावरे रा. मंचर जिल्हा पुणे फरार, सद्दाम शेख रा. श्रीगोंदा फरार. (८ हजार १३६ रूपये) अरबाज हबीब शेख वय २० रा. सुपा, ता. पारनेर, अक्षय उर्फ बाळू मांडगे रा. मेंगाळवाडी, ता. श्रीगोदे फरार.**

# माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे निधन

## सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

**भारत सरकारने दु:ख व्यक्त करत भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाची घोषणा केली आहे. त्यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात झाले.**

डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल. या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.



डॉ. मनमोहन सिंग यांना शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

# खऱ्या अर्थाने सच्चा माणूस हरवला!

## मनमोहन सिंग यांच्या निधनावर अण्णा हजारेंची प्रतिक्रिया | यूपीए सरकारविरोधात पेटवले होते रान

**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**तत्कालीन यूपीए सरकारविरोधात रान उठवणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. काही माणसे जन्माला येतात आणि जातात. पण काही माणसे समाज व देशाचा विचार करतात. मनमोहन सिंग हे त्यापैकी एक होते, असे उद्गार त्यांनी काढले आहेत.**

माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग (९२) यांचे शुक्रवारी रात्री दु:खद निधन झाले.



दिल्ली स्थित एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या सन्मानार्थ ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. ते मनमोहन सिंग यांच्या निधनावर शोक व्यक्त करताना म्हणाले, आंदोलनाच्या माध्यमातून माझी व डॉक्टर मनमोहन सिंग यांची अनेकदा भेट झाली. देश व समाजाविषयी कायम आस्था बाळगणाऱ्या माणसाचे निधन झाल्यामुळे मला दु:ख वाटत आहे.

मनमोहन सिंग हे खऱ्या अर्थाने सच्चा माणूस होते. ते नेहमी देशाचा विचार करायचे. निसर्गाच्या रुढीप्रमाणे माणसे येतात व जातात. पण काही माणसे समाज व देशाचा विचार करतात. मनमोहन सिंग हे त्यापैकी एक होते. एक सच्चा माणूस गेल्याने दु:ख वाटले, असे ते म्हणाले.

**यूपीए सरकारविरोधात केले होते उपोषण**

उल्लेखनीय बाब म्हणजे, अण्णा हजारे यांनी लोकपाल विधेयकासाठी १६ ऑगस्ट २०११ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर आमरण उपोषण केले होते. त्याला देशभरातून प्रतिसाद मिळाला होता. या आंदोलनामुळे तत्कालीन पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या सरकारविरोधात रोष निर्माण झाला होता. त्याची परिणिती २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे सरकार येण्यात झाली होती.

# डॉ. सिंग यांच्या निधनाने प्रशासक, अर्थतज्ञ गमावला

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शोकसंवेदना

**मुंबई : प्रतिनिधी**



**भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ञ गमावला आहे, अशी शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.**

आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री, पंतप्रधान अशा विविध भूमिकांमधून त्यांनी काम केले आणि देशवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या राजकारणात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्राशी संबंधित विपूल लेखन सुद्धा त्यांनी केले. त्यांनी केलेले कार्य कायम देशवासियांच्या स्मरणात राहील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि चाहत्यांच्या दु:खात मी सहभागी आहे. हे दु:ख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना लाभो, अशी मी प्रार्थना करतो.

# अमोल मिटकरींनी उंटाच्या..... घेण्याचा प्रयत्न करू नये

## भाजप आमदार सुरेश धस यांचा पलटवार | मस्साजोग प्रकरणात महायुतीमधील आमदारांमध्येच जुंपली

**बीड : प्रतिनिधी**

**महायुतीमध्ये सहभागी असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन आमदारांमध्ये चांगलेच आरोप प्रत्यारोप सुरू असल्याचे दिसून येत आहे. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते धनंजय मुंडे यांच्या विरोधात आघाडी उघडली आहे. याला उत्तर देताना आमदार अमोल मिटकरी यांनी सुरेश धस यांनी सुपारी घेतली असल्याची टीका केली होती. मात्र, यावर आता सुरेश धस यांनी देखील जोरदार प्रतिहल्ला चढवला आहे. अमोल मिटकरी अतिशय लहान आहेत. त्यांनी उंटाचा ..... घेण्याचा प्रयत्न करू नये, अशा शब्दात धस यांनी मिटकरी यांना सुनावले आहे.**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख प्रकरण आता चांगलेच तापले आहे. या प्रकरणी उद्या बीड जिल्ह्यामध्ये मोठा मोर्चा निघणार आहे. या मोर्चात भारतीय जनता पक्षाचा एकही नेता सहभागी होणार नसल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले. मात्र त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांना देखील जोरदार प्रत्युत्तर दिले. ते अद्याप खूप लहान असल्याचे सुरेश धस यांनी म्हटले आहे.

**बीड पोलिसांवर देखील आरोप**

बीड जिल्ह्यातील पोलिस हे एखाद्या नेत्याचे समर्थक किंवा एखादा पक्षाचे कार्यकर्ते असल्यासारखे वागत असल्याचा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. त्यांना समज देण्याची मागणी देखील भाजपा आमदार सुरेश धस यांनी केली आहे. पोलीसच काही माहिती देखील आरोपींना पुरवत असल्याचा आरोप देखील धस यांनी केला आहे.

**मोर्चात सहभागी नाही पण अधिकाऱ्यांशी संपर्कात**

बीडमध्ये उद्या होणाऱ्या मोर्चामध्ये भारतीय जनता पक्षाचा कोणताच नेता सहभागी होणार नसल्याचे देखील आमदार सुरेश धस यांनी सांगितले आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणी आपण सीआयडी अधिकाऱ्यांची चर्चा केली असल्याचे देखील धस यांनी सांगितले. ते एका वृत्त वाहिनीशी बोलत होते.




# प्रगतीमंत्र

# अभ्यास करण्यासाठी कोणती वेळ योग्य ?

**सध्या देशभरातील लाखो विद्यार्थी JEE, NEET आणि CUET ची तयारी करत आहेत. या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी विद्यार्थी रात्रंदिवस भरपूर मेहनत करत करत आहेत. परीक्षेच्या तयारीसाठी मुले तासनतास अभ्यास करत आहेत. काहीजण सकाळी लवकर उठून अभ्यास करत असतात, तर काही रात्री उशिरापर्यंत जागून या परीक्षांची तयारी करण्यात व्यस्त असतात. पण, अभ्यास करण्यासाठी सकाळची वेळ योग्य की, रात्रीची वेळ फायदेशीर याबद्दल जाणून घेऊया. वास्तविक पहाटे लवकर उठणे किंवा रात्री उशिरापर्यंत अभ्यास करणे ही वैयक्तिक आवडीची बाब आहे. दोन्ही वेळेचे त्यांचे फायदे आणि तोटे आहेत आणि ते कोणती वेळ निवडते यावर अवलंबून असते...**

## रात्री उशिरापर्यंत अभ्यासाचे तोटे

- झोप न लागणे : पुरेशी झोप न मिळाल्यास थकवा आणि चिडचिड होऊ शकते. त्याच वेळी, जर तुम्हाला सकाळी उठून शाळा, कोचिंग किंवा कॉलेजला जावे लागत असेल, तर तुम्ही दुसऱ्या दिवशी पूर्ण लक्ष केंद्रित करून अभ्यास करू शकणार नाही आणि याचा परिणाम तुमच्या अभ्यासावर होईल.
- आरोग्य : रात्री उशिरापर्यंत जागी राहिल्याने तुमच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. अभ्यासानुसार, एखाद्या व्यक्तीने दररोज ७ तासांची झोप घेणे आवश्यक आहे. अशा स्थितीत, एकंदरीत, सकाळी उठल्यानंतर ब्रह्म मुहूर्तामध्ये अभ्यास करणे चांगले. सकाळी लवकर शांत वातावरणात एकाग्रतेने आणि अभ्यास केल्याने, तुम्ही वाचलेले सर्व काही आठवेल.



## सकाळी लवकर उठून अभ्यास

- शांत वातावरण : सकाळी लवकर उठल्याने तुम्हाला शांत वातावरण मिळते, ज्यामुळे तुम्ही कोणत्याही अडथळ्याशिवाय अभ्यास करू शकता.
- एकाग्रता : सकाळी लवकर उठल्याने तुमचे मन शांत आणि एकाग्र राहते आणि त्यामुळे तुम्हाला चांगला अभ्यास करण्यास मदत होते.
- ताजेपणा : सकाळी लवकर उठल्याने तुम्हाला उत्साही वाटते, त्यामुळे तुम्ही बराच वेळ अभ्यास करू शकता.
- आरोग्य : सकाळी लवकर उठल्याने तुमच्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो.
- तथापि, हे सर्व फायदे तुम्हाला रात्री देखील मिळतात, याशिवाय तुम्हाला रात्री एकांतात अभ्यास करण्यासाठी जास्त वेळ मिळतो.


# गृहपाठ पूर्ण होत नाहीय? घरी अभ्यास करण्याच्या टिप्स!

**शालेय जीवनात स्वअभ्यासाचे किंवा गृहपाठाचे विशेष महत्व असते. आज जरी शिकवण्या, क्लासेस असले तरी विद्यार्थ्यांनी घरी स्वतःचा अभ्यास स्वतः करणे आवश्यक आहे. शाळेत शिकवलेल्या गोष्टींचा सराव करणे आणि ते आत्मसात करणे हा यामागचा उद्देश आहे...**



हल्ली शाळा आणि क्लासेस यामध्ये विद्यार्थी इतके व्यापून जातात की त्यांना स्व-अभ्यासासाठी वेळ नसतो किंवा त्यांना ते कंटाळा करतात. पण अभ्यास जर खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांमध्ये रुजवायचा असेल तर त्यांनी स्वतःचा अभ्यास स्वतः करणे गरजेचे आहे. त्यासाठीच शाळेत गृहपाठ दिले जायचे. म्हणूनच आजही विद्यार्थ्यांच्या स्व-अभ्यासवर शाळा भर देताना दिसतात. पण बरेचदा पालकांची तक्रार असते की मुले घरी अभ्यास करत नाहीत. म्हणूनच त्यासाठी काही खास टिप्स आज पाहणार आहोत.

- शाळा आणि क्लासेस याचे नियोजन : विद्यार्थी दिवसाचे ५ तास शाळेत असतात. त्यामुळे प्रवास आणि शाळेतला अभ्यास यांचा त्यांच्या मनावर, शरीरावर ताण आलेला असतो. त्यात शाळेतून आल्यावर पालक विद्यार्थ्यांना क्लासेसमध्ये पाठवतात. यामध्ये मुलांची बरीच ओढाताण होते



आणि त्यांना घरी अभ्यास करण्याचा कंटाळा येतो. म्हणून या वेळेचे नियोजन करायला हवे. कारण शाळेप्रमाणेच क्लासेसमध्ये शिक्षण दिले जात असल्याने त्यांचा स्वअभ्यास होत नाही. तो होण्यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन करून द्यायला हवे. क्लासेस इतकेच स्व-अभ्यासाला महत्व द्यायला हवे.
- खेळाच्या वेळाही महत्वाच्या : विद्यार्थ्यांनी घरी अभ्यास करायचा असेल तर त्यांचे मन आनंदी असायला हवे. त्यासाठी त्यांच्यावर केवळ अभ्यासाचा ताण न देता त्यांच्या खेळाच्या वेळाही जपायला हव्या. त्यांचे मन प्रफुल्लित राहिले तर विद्यार्थी स्वतः अभ्यासमध्ये रुची घेतील.
- पोषक वातावरण हवे : विद्यार्थ्यांना घरात पोषक वातावरण मिळायला हवे. त्यांना काय आवडते, काय नाही याची पालकांनी काळजी घ्यायला हवी. काही विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी एकांत हवा असतो तर काही विद्यार्थ्यांना अभ्यास करताना पालक समोर लागतात. काही विद्यार्थ्यांना अभ्यास करताना पूर्ण शांतता लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल लक्षात घेऊन तसे वातावरण घरात निर्माण करायला हवे. जेणेकरून विद्यार्थ्यांना घरात अभ्यास करताना आनंद मिळेल.
- झोप महत्त्वाची : घरी अभ्यास करणे म्हणजे रात्र रात्र जागून अभ्यास पूर्ण करणे असा त्याचा अर्थ होत नाही. दिवस भरातल्या वेळेतच घरच्या अभ्यासाचे नियोजन व्हायला हवे. अनेक विद्यार्थी रात्रीच्या वेळेत अभ्यास करत बसतात. पण अशाने अभ्यास होण्याऐवजी त्यांच्या तब्येतीवर परिणाम होतो. त्यामुळे शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी झोप महत्वाची आहे.
- घरामध्ये एक जागा निश्चित करा : घर लहान असो की मोठे विद्यार्थ्यांची अभ्यासाची जागा निश्चित हवी. कारण एका विशिष्ट ठिकाणी अभ्यास केल्यास त्या जागेची आपल्याला सवय होत. तिथे मन एकाग्र होते. हळूहळू त्या जागेवर बसल्यावर आपल्याला अभ्यासाची इच्छा उत्पन्न होते. शक्यतो ती जागा एखादे टेबल, अभ्यासाची फळी किंवा बैठी जागा असावी. झोपून अभ्यास करणे टाळावे.
- अभ्यासाचे व्यवस्थापन आणि वेळापत्रक : आपले विषय किती, त्यात कोणत्या विषयाच्या अभ्यास जास्त आहे यानुसार अभ्यासाचे नियोजन असायला हवे. त्या दिवसाचा अभ्यास त्याच दिवशी पूर्ण करायला हवा. अभ्यास अपूर्ण राहून साठत राहिला की त्याचाही ताण जाणवतो. त्यामुळे घरी अभ्यास कसा करतानाही त्याचे नीट नियोजन व्हायला हवे. शाळेमध्ये जसे वेळापत्रक असते तसे तुमचे घरच्या अभ्यासाचे देखील हवे. कोणत्या वेळेत कोणता विषय, कोणत्या विषयाला किती प्राधान्य दिले पाहिजे यानुसार एक वेळापत्रक तयार हवे. अभ्यासाचा आराखडा तयार असेल तर आपल्याला काय करायचे आहे याचा विचार करण्यात वेळ जात नाही. परिणामी घरीदेखील शिस्तबद्ध अभ्यास होतो.
- सराव महत्वाचा : घरच्या अभ्यासात सरावाला महत्व दिले पाहिजे. शाळेत जे शिकवले आहे त्याची उजळजी केल्याने शिकलेल्या गोष्टी अधिक पक्क्या होतात. यामध्ये शाळेत सांगितलेल्या महत्वाच्या गोष्टी, धड्याखालील स्वाध्याय याचा सराव केला तरी विद्यार्थ्यांना फायदा होईल.

# कृषी क्षेत्रात करा प्रगती!

**भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. आपल्या देशातील विकासात या क्षेत्राचा वाटा मोठा आहे. दिवसागणिक कृषी क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. आधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून कृषी क्षेत्राला अधिक प्रगत बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशातील जवळ जवळ सत्तर टक्के लोकसंख्या शेतीवर आधारित आहे. नव्या पद्धतीने शेतीचा विकास आणि संशोधन होण्यासाठी देशातील अनेक कृषी विद्यापीठे कार्यरत असतात...**



## होईल लाखोंची कमाई

कृषी विज्ञान यासारख्या नव्या संकल्पना उदयास येत असताना त्यामध्ये रोजगाराच्या अनेक संधी आता उपलब्ध होत आहेत. शेती हा व्यवसाय म्हणून उत्तम पद्धतीने केल्यास त्यामध्ये करिअर करता येते. कृषी उद्योगासाठी प्रशिक्षित तरुणांची गरज आता मोठ्या प्रमाणात भासत आहे. देशात ७० कृषी विद्यापीठ आहेत. या सर्व संस्थांमधून उत्तम दर्जाचे विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत. परदेशातील नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन, संशोधन आदी शाखांमध्ये कार्य होत आहे. इतर शाखांप्रमाणे याही क्षेत्रात करिअर करता येऊ शकते. आधुनिकीकरणाच्या या युगातही अनेक विद्यार्थी कृषी क्षेत्राकडे वळत आहेत. हल्ली कृषी विषयातील अनेक अभ्यासक्रम टॉप ट्रेंडमध्ये आहेत. या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून तरुणांना शेतीशी संबंधित उत्तम माहिती मिळणार आहे. ज्याच्या जोरावर तरुणांना नवीन क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळणार आहे. या क्षेत्रात तरुणांना लाखो नोकऱ्या सहज मिळू शकतात.



वैज्ञानिक शेतीमुळे देशातील शेतकरी स्वावलंबी होत आहेत. आधुनिक पद्धतीची शेती उत्पादनात वाढ करत असतानाच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठीही प्रभावी ठरत आहे. त्यामुळेच आता शेतकरी आपल्या शेतातील मातीची चाचणी करून खतांचे प्रमाण ठरवू शकतात. शिवाय, शेती-आधुनिक शेती, पशुवैद्यकीय विज्ञान, कृषी अभियांत्रिकी, वनीकरण, फलोत्पादन, अन्न आणि गृहविज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांचा अभ्यास करून विद्यार्थी त्यांचे भविष्य घडवू शकतात. सोबतच, कृषी क्षेत्रात मार्केटिंग आणि मॅनेजमेंट क्षेत्रातही अप्रतिम करिअर करता येते.

- अभ्यासक्रम कोणते ? : कृषी भौतिकशास्त्र, शेती व्यवसाय, वनस्पती पॅथॉलॉजी, वनस्पती प्रजनन आणि आनुवंशिकी, वृक्षारोपण व्यवस्थापन, कृषी अभियांत्रिकी, कृषी क्षेत्रात मार्केटिंग आणि मॅनेजमेंट.
- पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया : या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी तुम्ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र या विषयांसह बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. कृषी शास्त्रज्ञ होण्यासाठी B.E. किंवा कृषी पदविका करणे आवश्यक आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांकडे संबंधित विषयात स्पेशलायझेशन असावे.
- कृषी शिक्षण हे दोन स्तरावर : कृषी उच्च शिक्षण यात पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवीपर्यंत शिक्षण महाविद्यालयातून दिले जाते. कृषी निम्नशिक्षण पदविका ही कृषी विद्यालयातून दिले जाते. राज्यातील कृषी विषयातील उपलब्ध अभ्यासक्रम कृषी, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, अन्न तंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, गृह विज्ञान, मत्स्य विज्ञान, वनिकी, पशुसंवर्धन हे होत.
- कृषी क्षेत्रात नोकरीच्या संधी : देशातील तरुणांना दरवर्षी ICAR (भारतीय कृषी संशोधन परिषद) मध्ये नोकरीची संधी मिळते. UPSC मार्फत कृषी तज्ज्ञांच्या नियुक्तीसाठी परीक्षा देखील घेतली जाते. अनेक खासगी कंपन्या कृषी पदवीधरांना नोकऱ्याही देतात. हे पदवीधर शेतकऱ्यांना बँकेतील किसान क्रेडिट कार्ड, कर्ज आदी कामात मदत करू शकतात. बँकेच्या फिल्ड ऑफिसरच्या नोकरीसाठी कृषी क्षेत्रातील अनुभव असलेल्यांना प्राधान्य दिले जाते.

### या संस्थांमध्ये प्रवेशाला अधिक मागणी

- भारतीय कृषी संशोधन संस्था, नवी दिल्ली
- भारतीय पशुवैद्यकीय संशोधन संस्था
- राष्ट्रीय दुग्ध संशोधन संस्था
- इंदिरा गांधी कृषी विद्यापीठ
- अलाहाबाद कृषी संस्था
- जवाहरलाल नेहरू कृषी विद्यापीठ
- भारतीय कृषी संशोधन संस्था

# DMLT कोर्स : पगार अन् संधीही भरपूर

**दहावीनंतर विद्यार्थ्यांपुढे करिअरचे अनेक पर्याय खुले होतात. पण बहुतांश विद्यार्थी हे विज्ञान शाखेला पसंती दर्शवतात. या शाखेतून पुढे करिअरच्या अनेक वाटा खुल्या होत असल्याने विज्ञान शाखेला विशेष महत्व आहे. पण विज्ञान शाखा निवडूनही अनेकांना पुढे काय करायचे असा प्रश्न असतो. मग पुन्हा बारावीनंतर विद्यार्थी इंजिनियरिंग, बीएस्सी, बिझनेस मॅनेजमेंट असे काही ठराविक पर्याय निवडतात. पण विज्ञान शाखेतीलच एक महत्वाचा करिअरचा पर्याय म्हणजे 'डीएमएलटी'. अनेकांना या कोर्सविषयी पुरेशी माहिती नसल्याने विद्यार्थ्यांना या कोर्सचे महत्व ठावूक नाही. पण भविष्याला कलाटणी देणारा, उत्तम संधी आणि पैसे मिळवून देणारा असा हा कोर्स आहे. तेव्हा या विषयी, त्यातल्या अभ्यासक्रमाविषयी आणि पुढील संधींविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊया...**



- अभ्यासक्रमाविषयी : हा एक पॅरा मेडिकल कोर्स आहे. डीएमएलटी म्हणजेच डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी असे या कोर्सचे पूर्ण नाव आहे. हा अभ्यासक्रम केवळ विज्ञान शाखेतील विद्यार्थीच करू शकतात. हा दोन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे. पॅथलॉजी म्हणजेच वैद्यकीय प्रयोगशाळांची विस्तृत माहिती देणारा हा अभ्यासक्रम आहे.
- कोर्सचा उपयोग : आपल्या शरीरातील द्रवपदार्थ तसेच विविध सूक्ष्म घटकांचे संशोधन आणि अभ्यास या कोर्सद्वारे होतो. त्यामुळे रक्त तपासणी, लघवी तपासणी, थुंकी तापसणी आणि आरोग्य क्षेत्रातील अगणित चाचण्या करण्याचे काम हे डीएमएलटी कोर्स उत्तीर्ण झालेले उमेदवार करत असतात. सोप्या भाषेत सांगायचे तर आपल्या शरीरातील काही घटकाचे संशोधन करून आपल्याला झालेला आजार शोधण्याचे काम याद्वारे केले जाते.
- अभ्यासक्रम पात्रता : कोर्ससाठी प्रवेश घेण्याकरिता तुम्हाला जीवशास्त्र, रसायनशस्त्र, भौतिकशास्त्र या विषयांसह आणि किमान ५० टक्के गुणांसह बारावी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यामुळे जर हा कोर्स तुम्हाला करायचा असले तर दहावीनंतर विज्ञान शाखेत प्रवेश घेतानाच 'पीसीबी' हा ग्रुप निवडावा लागेल.
- महाविद्यालये आणि शुल्क : अभ्यासक्रमासाठी आता अनेक महाविद्यालये उपलब्ध आहेत. यामध्ये खासगी, शासकीय आणि निमशासकीय अशा तिन्ही पद्धतची महाविद्यालये आहेत. शासकीय महाविद्यालयांमध्ये कमी शुल्क आकारले जाते. पण खासगी महाविद्यालयात दोन वर्षांचे मिळून २५ हजार ते २ लाखांपर्यंत शुल्क आहे. हे शुल्क महाविद्यालयांवर अवलंबून आहे.

### करिअरच्या संधी

कोर्सनंतर तुम्ही पॅथॉलॉजीमध्ये वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणजेच लॅब टेक्निशियन म्हणून काम करू शकता. तुम्ही त्यामध्ये अधिक उच्च पदव्युत्तर पदवी प्राप्त केली तर तुमची स्वतःची लॅबदेखील सुरू करू शकता. अनेक मोठ्या कंपन्या आणि लॅबमध्ये अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध आहे. शिवाय शासकीय, खासगी रुग्णालये यांमध्येही तुम्ही नोकरी करू शकता. हॉस्पिटल, पॅथॉलॉजी लॅब, हेल्थकेअर सेंटर येथे डीएमएलटी उत्तीर्ण उमेदवारांची मोठी गरज भासते. या क्षेत्रात पगारही २५ हजारांपासून ते लाखोंच्या रकमेत तुमच्या अनुभवानुसार दिला जातो.



## शॉर्ट न्यूज

### जिल्हाध्यक्षपदी योगेश वामन यांची नियुक्ती

**नगर :** सह्याद्री छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते योगेश पांडुरंग वामन यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी वामन यांच्या नियुक्तीची घोषणा करुन त्यांना नियुक्तीपत्र दिले. यावेळी तालुकाध्यक्ष दत्ता वामन, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, सुभाष काकडे, सुभाष आल्हाट आदी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते योगेश वामन बांधकाम व्यावसायिक असून, विविध क्षेत्रात सामाजिक योगदान देत आहे.

### आंबेडकर चौकात मनुस्मृतिचे दहन

**नेवासा फाटा :** येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात सर्व समाजातील संविधानाला मानणारे चळवळीतील कार्यकर्त्यांनी मनुस्मृतिचे दहन करण्यात आले. सामोदायीक रित्या मनुस्मृतिचा निषेध करून भारतीय संविधानाचा विजयाच्या घोषणा दिल्या. यावेळी गणपतराव मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ ला छत्रपती शिवाजी महाराज यांची महाराष्ट्र राज्याची त्यावेळची राजधानी रायगड या किल्ल्याच्या पायथ्याशी आपल्या कार्यकर्त्यां समवेत महाराजांचा जय जय कार करत मनुस्मृतिचे दहन करत भारतातील जनतेला जाहिर केले.

### पतंग उडवताना विहिरीत पडून बालकाचा मृत्यू

**शिर्डी :** सावळीविहीर खुर्द येथे पतंग उडविताना एक आठ वर्षीय मुलगा जवळच्या विहिरीत पडून मृत्युमुखी पडला. ही घटना बुधवारी २५ डिसेंबरला दुपारच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे सावळीविहीर व परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. सावळीविहीर खुर्द येथील पहिली इयत्तेत शिकत असलेला यश हिरामण सोनवणे हा मुलगा नाताळची सुट्टी असल्यामुळे घरी होता. काल तो पतंग खेळत असताना जवळच असणाऱ्या व कठडा नसणाऱ्या एका विहिरीमध्ये पडला. त्याच्या समवेत असणारी इतर लहान मुले ओरडल्यामुळे आसपासचे लोक जमा झाले.

### रस्त्यांवरील अतिक्रमणाबाबत पोलिसांना निवेदन

**संगमनेर :** शहरातील जोर्वे नाका ते बसस्थानक, दिल्ली नाका ते पंचायत समिती रस्त्यावर अतिक्रमणामुळे नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांसह वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर जोर्वेचे माजी सरपंच गोकुळ दिघे यांच्यासह नागरिकांनी शहर पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख आणि आमदार अमोल खताळ यांना निवेदन देत कारवाईची मागणी केली.

### १७० अनधिकृत गॅस सिलेंडर जप्त

**श्रीगोंदा :** पोलिसांनी अनधिकृत विना कागदपत्राचे भारत गॅस कंपनीचे १७० सिलेंडरसह वाहतूक करणारा टेम्पो असा २६ लाख ६३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अनधिकृत गॅस सिलेंडरसह वाहतूक करणारा टेम्पो शिरूर येथे खाली करण्याकरीता घेऊन जाणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांना मिळाली होती. त्यांनुसार त्यांनी पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. पथकाने सापळा रचला.

# बस दुर्घटनेतील २५ मृतांच्या २० कुटुंबांचा न्यायासाठी संघर्ष!

## पीडित कुटुंबिय दीड वर्षे झिजवताहेत सरकारचे उंबरठे | दुर्घटनाग्रस्तांच्या मागणीला शासनाच्या वाटाण्याच्या अक्षता

**शिरुर : प्रतिनिधी**

**दीड वर्षांपूर्वीच्या समृध्दी महामार्गावरील बस दुर्घटना प्रकरणातील न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या अपघातग्रस्त कुटुंबियांच्या पाठपुराव्याला आता अंतच राहिलेला नाही. या सर्व पीडित कुटुंबांचा न्यायासाठीचा संघर्ष अजूनही सुरुच आहे. बस अपघात प्रकरणातील शिरूरच्या गंगावणे कुटुंबियांसह २५ मृतांची २० कुटुंबे न्यायासाठी व दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी आजही सरकारचे उंबरठे झिजवत आहेत.**



दि.१ जुलै २०२३ ची काळरात्र संपूर्ण महाराष्ट्राने पाहिली, ३३ प्रवाशांना घेऊन विदर्भ ट्रॅव्हल्सची खासगी बस बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा जवळ चालकाच्या लापरवाहीमुळे अनियंत्रित झाली आणि रस्ता दुभाजकावर आदळून तिचा अपघात झाला. या अपघातात २५ निष्पाप जीवांचा होरपळून दुर्देवी मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर राज्यभरातून शोक व्यक्त करण्यात आला होता. या अपघातात गंगावणे, गुप्ता, काळे, शेख, वंजारी, तायडे, पाते, गांडोळे, वनकर, सोमकुवर, पोहनेकर, खोडे, राऊत, खेलकर, बुधबावर, खडसे, बहाळे, सोनवणे, गोठे, पोकळे यांनी आपल्या परिवारातील सदस्य गमावले होते. त्यावेळी प्रधानमंत्री कार्यालय मार्फत या दुर्घटने विषयी शोक व्यक्त करून दोन लाख रुपयाचा निधी वितरित करण्यात आला होता. त्यावेळचे राज्याचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्धा जिल्हा पालकमंत्री पदावर असताना १ जुलै २०२३ रोजी त्यांनी प्रत्येक पीडिताच्या परिवारांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने २५ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याची घोषणा प्रसारमांध्यमापुढे केली होती मात्र हे आश्वासन दीड वर्षानंतर आजही पूर्ण झालेले नाही त्यासाठी अपघातग्रस्त कुटुंबियांचे नातेवाईक रोज सरकारचे दरवाजे ठोठावत आहेत.

या अपघातातील २५ मृतांच्या नातेवाईकांनी सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर मडावी यांच्या नियोजनामध्ये जस्टीस फॉर २५ पिपल्स नावाने लढा उभारला. मडावी यांच्या नेतृत्वाखाली वर्धा लोकसभेचे खासदार रामदास तडस यांची भेट घेऊन लोकसभेत ३७७ अतंर्गत मुद्दा उपस्थित केला होता, २० जुलै २०२३ ला जिल्हाधिकारी वर्धा यांना निवेदन दिले. पुढे २५ जुलैला पावसाळी अधिवेशनात वर्ध्याचे आमदार यांच्याव्दारे लक्षवेधी लावण्यात आली तरी देखील काहीही निष्पन झाले नाही.

१५ ऑगस्ट २०२३ ला श्रध्दांजलीच्या कार्यक्रमात खासदार, आमदार, जिल्हाधिकारी यांना काय कार्यवाही झाली या बाबतीत प्रश्न विचारला असता तिघांनीही नकारात्मक उत्तर देऊन जबाबदारी झटकून टाकली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर मडावी यांनी विविध जिल्ह्यातील मृतांच्या २० कुटुंबातील मंडळीना एकत्र करून नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ७ डिसेंबर २०२३ पासून वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय पुढे बेमुदत साखळी उपोषणाला बसून शासनाच्या फसवेगिरी करणाऱ्या धोरणाविरूध्द बंड पुकारले.१८ डिसेंबर २०२३ ला मूक मोर्चा काढला. ४ जानेवारी २०२४ लाख शर्म करो आंदोलन केले. पुढे १०४ दिवस साखळी उपोषण केले.

मुंबई मंत्रालयात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयात चौकशी करुन निवेदन दिले पण कोणत्याही प्रकारचा तिळमात्रही सकारात्मक प्रतिसाद पीडितांना मिळाला नाही. राज्यपाल सुरेश बैस, राष्ट्रवादीचे शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहीत पवार, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची सुध्दा प्रत्यक्ष भेट घेण्यात आली परंतू त्यांनी सुध्दा प्रतिसाद दिला नसल्याने संपूर्ण मृतांच्या परिवारा मध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

एवढे करुनही शासनाला पाझर फुटला नाही, असे या अपघातातील मृतांच्या नातेवाईकांनी सांगितले. न्याय मागणारी ही सर्व कुटुंब सामान्य परीवारातील असून न्याय मिळाल्याशिवाय आम्ही माघार घेणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

### आम्हाला न्याय कोण देईल...?

**गेली दीड वर्षांपासून आम्ही सतत लढा देत आहोत. अपघाताच्या तपासाची एस.आय.टी. मार्फत चौकशी करावी, विदर्भ ट्रॅव्हल्सची अपूर्ण कागदपत्रे असल्याने त्या एजन्सीची मान्यता रद्द करावी, देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यांपुढे केलेल्या २५ लाखाच्या घोषणेची अंमलबजावणी करावी या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. त्यासाठी या अपघातात बळी पडलेल्या सर्व मृतांचे कुटुंबिय,नातेवाईक एकत्रितपणे लढा देत आहेत. या संवेदनशील प्रकरणात सरकारने आमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून न्याय द्यावा अशी माफक अपेक्षा आहे.**

**ॲड. अमर काळे**
गंगावणे यांचे नातेवाईक

वाचकांच्या लेखणीतून

# स्वधर्माला टाळू नका

हल्ली मुलांच्या नावांमध्ये मोठी क्रांती झालेली दिसते. दगडू, धोंडू किंवा दगडाबाई, धोंडाबाई ही नावे तर कधीच अस्तंगत झाली आहेत. राम, कृष्ण, सरस्वती, रोहिणी, सगुणा ही नावेसुद्धा कधीच मागे पडलेली आहेत. रॉकी, फिलीप,रुबिना, शबिना, रोशनी अशी नावे ठेवण्याकडे कल वाढत आहे. आपल्या मुलांची नावे कुणी काय ठेवावी, हे ठरविणारे आपण कोण? या बाबतीत जो तो सर्वतंत्र स्वतंत्र आहे. हे जरी कबूल केले तरी आपल्या धर्माने काही संकेत ठरवून दिलेले असतात. ते आपण पाळले पाहिजेत. कारण धर्म हे आपले संरक्षक कवच आहे. धर्मो रक्षति रक्षित: (जो आपल्या धर्माचे रक्षण करील त्याचे रक्षण धर्म करीन) असे वचन आहे. याच मथळ्याचा वि.दा. सावरकरांचा प्रसिध्द निबंधही आहे . आपला धर्म आपण पाळणे यात अन्य धर्माचा अवमान नसून आपल्या धर्माचे उत्थान आहे. हे आपण जाणले पाहिजे. आपल्या भाषेतील शब्द आपल्याशी बोलतात. विष्णू नावाचे महिमान विष्णुसहस्त्रनामात पहायला मिळेल. सगुणा नावात स+गुणा = गुणांसहित असा अर्थ आहे. दिलीप, राम हे रघुवंशातले राजे होते. कृष्णाचा महिमा भागवत पुराण सांगेल. ओवी. किती छान आहे मुलीचे हे नाव! मराठी भाषेचा आवडता छंद. जात्यावरची ओवी. ज्ञानेश्वरी ग्रंथातली ओवी. या नावांच्या निमित्ताने




आपल्या धर्माची गंगा अखंडपणे प्रवाहित राहिली पाहिजे. परधर्माचा अवमान करू नये याचा अर्थ आपल्या धर्माचा अवमान करावा असा होत नाही.
परधर्माला भाळू नका
स्वधर्माला टाळू नका
स्वधर्मे निधनं श्रेय: (स्वधर्मात राहून मरण आले तरी श्रेयस्कर आहे) असे श्रीमद्भगवद्गीता सांगते. ते व्यर्थ आहे का?


**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# मुळा डावा कालव्याचे रब्बी हंगामातील आवर्तन सोडले

## १० हजार १२१ हेक्टर लाभक्षेत्रासाठी २१ दिवस राहणार पाणी

**राहुरी : प्रतिनिधी**

**मुळा डावा कालव्याच्या लाभक्षेत्रात रब्बी हंगामातील पाण्याचे आवर्तन गुरुवारी सोडण्यात आले. मुळा धरणावर आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते धरणावरील पंप हाऊसमधील कळ दाबून ३०० क्युसेकने पाणी सोडण्यात आले. दरम्यान, लाभक्षेत्रासाठी हे आवर्तन २१ दिवस चालणार आहे.**



यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष सुरेश बानकर, जिल्हा परिषद माजी सदस्य धनराज गाडे, अशोकराव उंडे, संदीप गिते, अनिलराव आढाव, मयूर गवळी, उत्तमराव म्हसे, अविनाश बाचकर, सुरसिंग पवार, नंदकुमार साळवे, नितीन नरोडेसह मुळा डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते. मुळा डावा कालव्यातून तसेच निळवंडे कालव्यातून राहुरी लाभक्षेत्रात पाण्याचे आवर्तन सोडण्यात यावे, अशी मागणी लाभार्थी शेतकऱ्यांनी केली होती. या मागणीवरून आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करून पाणी आवर्तनाचा प्रश्न मार्गी लावला आहे.

निळवंडे कालव्यातून शुक्रवारी सायंकाळपर्यंत पाणी सोडून राहुरी लाभक्षेत्रातील पाणी प्रश्न मार्गी लागेल, अशी माहिती आमदार कर्डिले यांनी दिली. गुरुवारी, १९ डिसेंबरला मुळा उजवा व वांबोरी लाभक्षेत्रात रब्बी हंगामातील पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले होते. या पाठोपाठ गुरुवारी, २६ डिसेंबरला मुळा डावा कालव्याचे आवर्तन सुटल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यात समाधान व्यक्त केले जात आहे. मुळा डावा कालव्यावर १० हजार १२१ हेक्टर कृषीसिंचन अवलंबून असल्याने हे आवर्तन २१ दिवस चालणार आहे. गुरुवारी, १९ डिसेंबर ते २४ डिसेंबर सकाळपर्यंत मुळा उजव्या कालव्यातून ४७७ दशलक्ष घनफूट, तर वांबोरी चारीच्या लाभक्षेत्रात ७६ दशलक्ष घनफूट पाणी सोडण्यात आले आहे. गुरुवारी उजव्या कालव्यातून ९५० क्युसेकने पाण्याचे आवर्तन सुरू होते. उजव्या कालव्याचे हे आवर्तन ३५ दिवस, तर वांबोरी चारीचा आवर्तन कालावधी १०० दिवसाचा आहे.

**मुळा धरणात सध्या ९४ टक्क्यांवर पाणीसाठा**

मुळा डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्रासाठी गुरुवारी आवर्तन सोडण्यात आले आहे. दरम्यान, गुरुवारी मुळा धरणाचा पाणीसाठा २४ हजार ५५४ दशलक्ष घनफूट (९४.४३ टक्के) पाणीसाठा होता. मागील वर्षी आजच्या दिवशी मुळा धरणाच्या पाणीसाठ्याची २० हजार ३५१ दशलक्ष घनफूट (७८.२७ टक्के) नोंद होती. त्यामुळे गतवर्षीपेक्षा जास्त पाणीसाठा सध्या धरणात आहे.

# थिटे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना फेलोशिप

## गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचा हात

**शिरूर : प्रतिनिधी**

**श्री. छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ डी. फार्मसी आणि बापूसाहेब थिटे कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परिमल ॲण्ड प्रमोद चौधरी फाउंडेशन आणि ओपाश सोसिओ. कमर्शियल प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने फेलोशिप देण्यात आली.**



या कार्यक्रमासाठी पी.पी.सी.एफ. मार्फत उपस्थित असलेल्या सौ. सुजाता गोहड आणि श्री. बाबू भंडारे या मान्यवरांचे सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सौ. सुजाता मॅडम यांनी विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यामागील मुख्य उद्दिष्ट्ये आणि त्याबाबतची प्रक्रिया सविस्तरपणे सांगितली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा सरांनी सुद्धा फेलोशिपचे महत्व तसेच या विद्यार्थ्यांनी भविष्यामध्ये इतर गरीब कुटुंबातील गुणवंत मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आर्थिक मदत करावी आणि समाजासमोर एक आदर्श व्यक्ती बनावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तसेच काही विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

डी. फार्मसीचे कु. कृतिका गलांडे, कु. तुषार धाडगे, कु. श्रद्धा इचके, कु. बहिरट अमृता तसेच जी. एन. एम. नर्सिंगच्या कु. पायल गाडे, कु. कावेरी अरेकर, कु. सानिका दरेकर, कु. शिवानी झालटे अशा ८ विद्यार्थ्यांना एकूण रक्कम ५,०६,०५८ फेलोशिप स्वरूपात प्राप्त झाली. या कार्यक्रमासाठी पी.पी.सी.एफ. च्या सौ. सुजाता गोहड आणि श्री. बाबू भंडारे, डि. फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल शहा आणि नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शीतल बर्डे, प्रो. मानसी गरदरे, पालक आणि विद्यार्थीही उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र थिटे, सचिव श्री. धनंजय थिटे, डॉ. हर्षवर्धन थिटे आणि डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांनी फेलोशिप दिल्याबद्दल पी. पी. सी. एफचे आभार मानले व फेलोशिप प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ

## डीजेवर बंदी घालण्याची मागणी




**नगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यात सुरु असलेल्या सांस्कृतिक कला केंद्रामध्ये डीजेचा वापर होत असल्याने लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे डीजेवर बंदी घालावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोककलावंतांनी आंदोलन केले. याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.**

यावेळी लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, प्रकाश काळे, माउली मोहरकर आदीसह लोककलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यात १०० ते २०० लोक कलावंत आहेत. सांस्कृतिक कला केंद्रामध्ये डीजे, तसेच टेप रेकॉर्डर या उपकरणाचा सरार्स वापर होत असल्याने ढोलकी, तबला, पेटी वादक लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

# शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची गरज

## शिवव्याख्याते प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांचे प्रतिपादन




■ सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले.

निघोज : प्रतिनिधी

**स्वराज्याची निर्मिती करताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी जे व्यवस्थापन केले त्याचे अनुकरण आजी करण्याची आवष्यकता असल्याचे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांनी केले.**

सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचे सरपंच चित्रा वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वराळ, सचिन वराळ, प्राचार्य डॉ. अमोल शहा, डॉ. बाहेती, मंगेश लाळगे, प्राचार्य डॉ. सहदेव आहेर, मुख्याध्यापक कैलास शिंदे, मंगेश वराळ, सुधामती कवाद, पत्रकार दत्तात्रय उनवणे, ज्ञानेश्वर कवडे यांच्या उपास्थितीत उदघाटन करण्यात आले. यावेळी प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कवाद म्हणाले, शिवाजी महाराजांनी बलशाली हिंदुस्तानची निर्मिती करताना सर्व जाती धर्मांना सोबत घेतले. मावळे आणि हिरकणीने रक्ताचे पाणी केले. स्वराज्याचे व्यवस्थापन करताना हिंदुस्तानची धर्मिक, सामाजिक, शैक्षणिक संस्कृती बलशाली झाली पाहिजे यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केले गेले. त्यामुळे चारशे वर्षानंतरही छत्रपतींचे नाव घेतले जाते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे अशा पध्दतीने व्यवस्थापन केले की जगातील सर्वोच्च इतिहासाचे मानकरी म्हणून सर्वच देशांचे प्रमुख त्यांचा जयजयकार करतात असे असल्याचे कवाद म्हणाले. कार्यक्रमाधिकारी परभाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### मावळा आणि हिरकणी म्हणून संस्कृती जपा

**आजचा विद्यार्थी असो की विद्याथनी त्यांनी मावळा आणि हिरकणी म्हणून आपल्या संस्कृतीला जपण्याचे काम केले पाहिजे. शिवाजी महाराज, संभाजी महाराज तसेच मातोश्री जिजाऊ यांच्या शिकवणीची आठवण ठेऊन समाजात कार्यरत राहण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे.**

### निघोजकरांचे मोठे सहकार्य

**गेल्या दोन वर्षांपासून निघोजमध्ये शिबिराचे आयेजन करण्यात येत आहे. निघोजकरांनी सामाजिक योगदान देत मोठे सहकार्य केले आहे. सक्षम असलेल्या निघोज गावाकडून संस्कृतीला प्राधान्य देण्याची भुमिका गावकरी घेतात. त्यातून विद्यार्थ्यांना शिकण्यासारखे भरपूर असते. ग्रामपंचायत पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांचे सहकार्यही मोलाचे असते.**

**डॉ. अमोल शहा, डॉ. बाहेती**

# रांजणखळगे परिसर झाला चकाचक!

## थिटे कॉलेजच्या शिबिरार्थींचे श्रमदान

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील जगप्रसिध्द रांजणखळगे परिसर चकाचक झाला आहे. सिताबाई थिटे कॉलेजच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरातील शिबिरार्थीनी शिबिराच्या पहिल्या दिवशी श्रमदान करीत हा परिसर, बगीचा, मळगंगा देवी मंदिर परिसर, स्मशानभुमी परिसर स्वच्छ केला.**



■ थिटे महाविद्यालयाच्या शिबिरार्थीनी जगप्रसिध्द रांजणखळगे परिसराची स्वच्छता करीत श्रमदान केले.

रांजणखळगे परिसरात अनेक सामाजिक संस्थांनी वृक्षारोपण केले असून वृक्षसंवर्धन जोमाने व्हावे या हेतूने शिबिरार्थीनी या झाडांभोवती खुरपणीही केली. प्राचार्य डॉ. अमोल शहा व डॉ. बाहेती यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा. परभाणे यांच्या नेतृत्वाखाली या महाविद्यालयाचे सत्तर विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले आहेत.

थिटे महाविद्यालयाचे हिवाळी शिबिर दुसऱ्या वर्षी निघोजमध्ये पार पडत असून शिबिराच्या उद्घाटनानंतर शिबिरार्थीनी जगप्रसिध्द रांजणखळगे परिसराची निवड श्रमदानासाठी केली. हाती झाडू, घमेली, खुरपी घेत या परिसराचे रूपडे बदलून टाकले. रांजणखळगे तसेच जागृत देवस्थान मळगंगा देवीच्या मंदिरामुळे सुटीच्या दिवशी पर्यटक तसेच भाविकांची या परिसरात मोठी वर्दळ असते. त्यामुळे या परिसरात अस्वच्छता निर्माण होते. त्यासाठी या परिसरात सातत्याने ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियान मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे पदाधिकारी, शिवबा संघटना, तालुका पत्रकार संघ, मराठी पत्रकार संघ यांच्याकडून राबविण्यात येते. नाताळच्या सुटीच्या पार्श्वभुमीवर बुधवार, गुरूवार, शुक्रवार या तीनही दिवसांत पर्यटकांची मोठी गद कुंड परिसरात झाली होती. या परिसरातील स्वच्छता पर्यटकांना चांगलीच भावली.

### सामाजिक उपक्रम

**थिटे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिरास सुरूवात झाल्यानंतर ग्रामअभियान ग्रामस्वच्छता, निघोज व परिसरातील स्मशानभुमींना रंग रंगोटी, आरोग्य विषयक माहीती देणारे तज्ञ डॉक्टरांचे व्याख्यान आदी सामाजिक उपक्रमांचे या शिबिरादरम्यान आयोजन करण्यात आले आहे.**

---

# मार्चपासून नगर शहरात धावणार ई-बस

## पहिल्या टप्प्यात १० बसेस मिळणार

नगर : प्रतिनिधी




**केंद्र सरकारच्या शहरी विकास मंत्रालयामार्फत अहिल्यानगर शहरासाठी ४० ई-बसेस उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी महापालिकेकडून केडगाव येथे चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यात दहा बसेस उपलब्ध होणार असून, मार्च महिन्यात ही सेवा सुरू होईल, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.**

या योजनेत नगर शहराला गरजेनुसार ३५ सीटच्या ४० बसेस उपलब्ध होणार आहेत. केंद्र शासनाने बस उपलब्ध करून देण्यासाठी नवीदिल्ली येथील कंपनीला काम दिले आहे. मार्च महिन्यात पहिल्या टप्प्यातील दहा बसेस उपलब्ध होणार आहेत. चार्जिंग स्टेशनसाठी महापालिकेने केडगाव येथील अडीच एकर जागा निश्चित केली आहे. तेथे वीज भार मंजूर झालेला आहे.

सोनेवाडी सब स्टेशन पासून महापालिकेच्या सबस्टेशन पर्यंत विजेचा पुरवठा करणारी उच्चदाब वाहिनी टाकण्याचे काम महावितरणमार्फत सुरू आहे. या कामाचा खर्च केंद्र सरकार करणार असून हा १.९७ कोटी रुपयांचा निधी थेट महावितरणकडे वर्ग झाला आहे. तसेच, चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी ९.०६ कोटी रुपये मंजूर असून त्याचे कामही सुरू झाले आहे. कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या असून, लवकरच हे कामही पूर्ण होईल, असे आयुक्त डांगे यांनी सांगितले.

# बहिरोबावाडीत काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

## समाजकल्याण विभागाचा ९ लाखांचा निधी

किन्ही : प्रतिनिधी



**तालुक्यातील किन्ही-बहिरोबाचाडी ग्रामपंचायत अंतर्गत बहिरोबावाडी येथील दलित वस्तीमधील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत नवबौध्द घटकांचा विकास करणे या योजनेतून मंजुर करण्यात आलेल्या ९ लाख रूपये खर्चाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ शेतकरी नेते अनिल देठे व ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आला.**

या रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार होऊन कार्यारंभ आदेश प्राप्त होताच रस्ता कामास सुरूवात करण्यात आली. भुमिपुजन समारंभास सामाजिक कार्यकर्ते संपत पवार, रामकृष्ण पवार, शाहिर साहेबराव पवार, यशवंत व्यवहारे, सिताराम देठे, बाळासाहेब शिंदे, किरण पवार, संकेत व्यवहारे, प्रवीण पवार, राजेंद्र पवार, बाजीराव पवार, शरद व्यवहारे, भिकाजी व्यवहारे, मंगेश पवार, मोहन मोढवे यांच्यासह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

### आंबेडकर वस्तीचे कामही लवकरच

**बहिरोबावाडी येथील पवार वस्तीसाठी सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी ९ लाख रूपयांचा निधी मंजुर झाला असून धोत्रे रस्त्यालगत नव्याने निर्माण झालेल्या आंबेडकर वस्तीसाठी तीन लाख रूपयांचा निधी मंजुर झाला असून हे कामही लवकरच सुरू करण्यात येणार आहे.**

**अनिल देठे**
ग्रामपंचायत सदस्य, किन्ही-बहिरोबावाडी

# पुरस्काराच्या माध्यमातून आहेर यांच्या योगदानाचा सन्मान !

## किसनराव पावडे यांचे प्रतिपादन । भाऊसाहेब आहेर यांना साने गुरूजी पुरस्कार प्रदान

पळसपुर : प्रतिनिधी



**आदर्श शिक्षक भाउसाहेब आहेर यांना साने गुरूजी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा सन्मान करण्यात आल्याचे प्रतिपादन मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासकीय अधिकारी किसनराव पावडे यांनी केले.**

घाटकोपर येथे महापालिका माध्यमिक शिक्षकसंघ आणि पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दरवष दिला जाणारा साने गुरूजी आदर्श शिक्षक पुरस्कार महानगरपालिका माध्यमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब आहेर यांना सन्मानपुर्वक प्रदान करण्यात आला, त्यावेळी पावडे यांनी आहेर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, या पुरस्कारासाठी अतिशय योग्य व्यक्तिची निवड करण्यात असून आमच्या पारनेर तालुक्यातील पळसपुरच्या भुमिपुत्राला या पुरस्कारामुळे न्याय मिळाला याचा मला सार्थ अभिमान आहे.

शिक्षक आहेर यांना सन्मानचिन्ह, मानाची शाल, फेटा, पुष्पगुच्छ व रोख रक्कम आमदार राम कदम यांच्या हस्ते व प्रसिध्द विनोदी अभिनेता पंढरीनाथ तथा पॅडी कांबळे, संस्थापक अध्यक्ष सुरेश डावरे, प्रशासकीय अधिकारी किसनराव पावडे, नगरसेवक प्रकाश गंगाधरे, अप्पासाहेब बागल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सन्मानपुर्वक प्रदान करण्यात आला.

पावडे म्हणाले, शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल आहेर यांना पुरस्कार देताना घेण्यात आली. आहेर यांच्यासारख्या ज्येष्ठ शिक्षकाची निवड केल्याने या पुरस्काराची उंचीही वाढली असून आहेर यांची जबाबदारीही वाढली आहे. यावेळी रोहोकले, चौधरी, शेळके, गुंड, पारधी,रोकडे, उचाळे, गावडे, आवारी, हांडे, वाळुंज, औटी, गवंडी, पवार, राठोड, कातकडे आदी आहेर यांचे सहकारी उपस्थित होते. अप्पासाहेब बागल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

# तळागाळातील कलाकारांसाठी सोलो डान्स स्पर्धा

## साडेचार लाखांची पारितोषिके । अश्वयुग महिला मंचचा उपक्रम



सुपा : प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील तळागाळातील कलाकारांच्या कलेस वाव मिळावा या हेतूने अश्वयुग महिला मंचच्या वतीने सर्वात मोठया ऑनलाईन सोलो डान्स स्पर्धेचे आयोजन केल्याची माहीती अभिनेत्री अश्विनी इरोटे यांनी दिली.**

अभिनेत्री अश्विनी इरोळे यांनी दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या अश्वयुग महिला मंचच्या महाराष्ट्रभरात १८ हजार महिला सभासद असून सभासद होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात आलेले नाही. महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांतील तालुके, गाव पातळीवर महिला पदाधिकारी सक्षमपणे काम करत आहेत. शिरूर जिल्हा पुणे येथे संपर्क कार्यालय असलेल्या या संस्थेने गेल्या दोन वर्षाने अनेक सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत.

अश्वयुग महिला मंच सांस्कृतीक, अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. दोन वर्षात राबविलेल्या गेलेल्या विविध उपक्रमांप्रमाणेच यंदा महाराष्ट्रातील तळागाळातील घटकांसाठी काम करण्याचा निर्णय घेण्यात येउन ऑनलाईन सोलो डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी साडेचार लाख रूपयांची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

स्पर्धेला जाण्यासाठी शेकडो किलोमिटरची धावपळ, वेळेचा अपव्यय अशा गोष्टींमुळे इच्छा असूनही या स्पर्धांमध्ये सहभागी होता येत नाही. अश्वयुगने ऑनलाईन स्पर्धा आयोजित केल्याने महराष्ट्राच्या कोणत्याही भागातील स्पर्धकास या स्पर्धेत सहभाग नोंदविता येणार आहे.

### ही आहेत बक्षिसे

**स्पर्धेत विजेतेपद पटकाविणाऱ्यास दोन लाख रूपयांचे प्रथम पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. उपविजेत्या स्पर्धकास एक लाख रूपये रोख, सन्मानचिन्ह व पारितोषिक, तिसऱ्या क्रमांकावरील स्पर्धकास ५० हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेतील ५० स्पर्धकांना दोन हजार रूपये रोख सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येणार असून या स्पर्धेत ३ ते ६५ वर्षांपर्यंतची मुले, मुली, महिला, पुरूष सहभाग घेऊ शकणार आहेत.**

### अशी करा नाव नोंदणी

**स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ थाटामाटात पार पडणार असून स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी ८८८८०८८७१८ या क्रमांकाच्या व्हॉटसअॅप क्रमांकावर आपली माहीती पाठविण्याचे आवाहन लेखक, दिग्दर्शक भाऊसाहेब इरोळे यांनी केले आहे.**

# खेळातून जीवनात नवी उमेद निर्माण होते

## अनिकेत पठारे यांचे प्रतिपादन । एमइटी स्कुलमध्ये क्रीडा स्पधेचा शुभारंभ

सुपा : प्रतिनिधी

**खेळाच्या माध्यमातून आपल्या जीवनात शिस्त, परस्पर सहकार्य निर्माण होण्याबरोबच यशाचा पाया घालता येतो. खेळ हा केवळ स्पर्धा नसून खेळातून जीवनामध्ये नवी उमेद निर्माण होते असे प्रतिपादन माऊली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे यांनी केले.**




जिल्हयात वेगवेगळया उपक्रमांसाठी, आपल्या गुणवत्तेसाठी वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सुपे येथील एमइटी इंग्लिश मिडियम स्कुलमध्ये यंदाही गुरूवार दि.२६ रोजी शाळा अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या शुभारंभाप्रसंगी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

पूर्व माध्यमिक विभागाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेने या क्रीडा महोत्सवास प्रारंभ झाला. अतिशय भव्य आणि उत्साहवर्धक वातावरणात, दिमाखात पार पडलेल्या या सोहळयास अनिकेत पठारे यांच्यासह मुख्याध्यापीका मोनाली पठारे, व्हाईस प्रिन्सिपल अनिता शर्मा, समन्वयक सरिता पंचे, शिक्षक देशमुख, योगेश चेडे यांच्यासह पालक, शिक्षक आणि विद्याथ मोठया संख्येने उपस्थित होते.

प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रमास सुरूवात झाली. त्यानंतर विविध प्रदर्शनीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे विविध स्पर्धामध्ये पालकांचा सहभाग लक्षणीय होता. सर्वच सहभागी पालकांनी आपापल्या बालपणातील खेळाडू जागृत करून उत्कृष्ट खेळ सादर केला. पालकांनाही बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. मुख्याध्यापिका मोनाली पठारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### विद्यार्थी, पालकांना सकारात्मक उर्जा

**या उत्साहवर्धक स्पर्धांमुळे उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे पहावयास मिळाले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांत सहभाग नोंदवत स्वास्थ्य, शिस्त आणि आनंद या मुल्यांचा जागर केला. संपूर्ण वातावरण खेळाडूंच्या जिद्द, परस्पर सहकार्य आणि आनंदाने भारावून गेले होते. या प्रेरणादायी सोहळयामुळे विद्यार्थी, पालक यांना सकारात्मक उर्जा मिळाली.**

**मोनाली पठारे**,मुख्याध्यापिका

### पत्रकार रसाळ विजेते !

**रिले रेस या क्रीडा प्रकारात रेष्मा येणारे यांनी प्रथम क्रमांक पटकावित छाप पाडली. पुनम येणारे यांनी व्दितीय तर मीना मगर यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. रस्सीखेच प्रकारात पत्रकार शरद रसाळ यांनी प्रथम क्रमांक पटकावित पत्रकारही मागे नसल्याचे दाखवून दिले. अतुल मेहेत्रे व्दितीय तर स्वप्निल काळे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. सर्वांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com